वाचले: १.निवड समिति सभा दिनांक १३/०२/२०१४

२.मा.आयुक्त यांचे कडील दि. चा मान्य प्रस्ताव.

---

कार्पोरेशन इंटिग्रेटेड हेल्थ अँड
फॅमिली वेलफेअर सोसायटी
क्र.वैद्य/8अ/कावि/536/2014
दिनांक:10/07/2014

विषय: ए.एन.एम. पदावर एकत्रित मानधनावर 6 महीने कालावधी करिता हंगामी नेमणूकी बाबत...

आदेश,

कार्पोरशन इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर सोसायटी अंतर्गत दिनांक 17/01/2014 रोजी मनपाच्या वेब साइटवर ए.एन.एम हे पद भरण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध करणेत आली होती. सदर जाहिरातीस अनुसरून आलेल्या अर्जाची छाननी करून 13 उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलवण्यात आले होते त्यापैकी खालील उमेदवारांची र.रु.7500/- प्रति माह याप्रमाणे एकत्रित मानधनावर खालील अटी व शर्तीवर आदेशाचे तारखेपासून पुढील 6 महिन्याकरिता नेमणूक करणेस मी "आयुक्त" तथा "अध्यक्ष" कार्पोरशन इंटिग्रेटेड हेल्थ अँड फॅमिली वेलफेअर सोसायटी या आदेशान्वये मान्यता देत आहे.

| अनू.क्र. | उमेदवाराचे नाव |
|---|---|
| 1 | श्रीम.विन्हेरकर राजश्री प्रकाश |
| 2 | श्रीम.दहिठणकर रूपाली मन्मथ |
| 3 | श्रीम.मनीषा शिवाजी ननवरे |

१. मानधनावरील पदासाठी विहित केलेले एकत्रित मानधन देण्यात येईल.
२. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांना लागू असणाऱ्या इतर सुविधा,हक्क,व आर्थिक लाभ आपणास मिळणार नाही.तथापि १.५ महिन्यातून एक

किरकोळ रजा या प्रमाणे किरकोळ रजा देय राहतील.

३. दवाखाना,रुग्णालय व कार्यालयाप्रमाणे साप्ताहिक सुट्टी राहील.तसेच सार्वजनिक सुट्टी देय राहील. ज्या सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी नियंत्रण प्रमुखांना आपल्या सेवेची आवश्यकता असेल व त्यांनी तसे आदेश निर्गमित केल्यास सदर सार्वजनिक सुट्टीची पर्यायी सुट्टी नियुक्त केलेल्या कालावधीत उपभोगता येईल.

४. कामकाजाची वेळ दवाखाना,रुग्णालय व कार्यालयाच्या वेळेनुसार राहील.

५. मानधनावरील पदाचे कामकाज हे संबंधित नियंत्रण अधिकारी व विहित केलेल्या कार्यक्षेत्रात राहील .

६. मानधनावरील पदावर काम करताना आपणाकडून सर्वांना नि:पक्षपातीपणाची वागणूक मिळणे आवश्यक आहे.

७. कामकाजासाठी दिलेल्या साहित्याची जबाबदारी आपणावर राहील.

८. एकत्रित मानधनावर नियुक्त केलेल्या पदावरील काम सोडताना किमान एक महिना अगोदर लेखी पूर्व सूचना कार्यालयास देणे आपणास बंधनकारक राहील.

९. नियुक्ती कालावधीत आपले कामकाज ,हजेरी व वर्तणूक समाधानकारक नसल्यास अथवा आपल्या सेवेची आवश्यकता नसलेस कोणतीही पूर्वसूचना न देता आपल्याला मानधनावरील पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्यात येईल.

१०. मानधनावरील नियुक्ती म्हणजे नोकरी नाही. त्यामुळे मनपा आस्थापनेवर वेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणुन निवेदन सादर करणार नाही. किंवा तसा बाहय दबाव आणणार नाही,कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करणार नाही या बाबत र.रु.100/- चे स्टॅम्प पेपरवर हमीपत्र लिहुन द्यावे लागेल.

११. मानधनावर काम करीत असताना १० दिवस किंवा १० दिवसांपेक्षा जास्त दिवस विनापरवाना गैरहजर राहिल्यास आपली सेवा समाप्त करणेत येईल व त्या जागी नवीन नेमणूक करून रिक्त पद भरले जाईल याची नोंद घ्यावी.

**सदर आदेश प्राप्त होताच त्वरित पिंपरी चिंचवड महानगरपालिका,मुख्य कार्यालय , वैद्यकीय विभाग ,२ रा मजला येथे रुजू व्हावे. त्यानंतर आपणास सविस्तर नेमणूक देण्यात येईल.**

सही/-
अध्यक्ष
कार्पोरशन इंटिग्रेटेड हेल्थ अँड
फॅमिली वेलफेअर सोसायटी